## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. १८५/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १४/०३/२०१७

**१) तरुणीचा विनयभंग केल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक ३०/०१/२०१७ चे ०९.३० ते १३/०३/२०१७ चे १०.०० वा. दरम्यान यातील आरोपीने आपले मोबाईल वरुन फिर्यादीचे मोबाईल वर वारंवार फोन करुन मी तुझा नवरा बोलतो असे बोलुन अश्लिल शब्दात बोलुन फिर्यादीस लज्जा वाटेल अशा प्रकारे बोलल्याने फिर्यादींचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन मोहाडी येथे कलम ३५४(अ)(ड),५०९,५०७ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. गेडाम पो.स्टे. मोहाडी हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**२) अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन महीलेचा विनयभंग केल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक १३/०३/२०१७ चे ०९.३० वा. दरम्यान यातील फिर्यादी ही एकटी घराचे दरवाज्यात उभी असतांना यातील आरोपीने तिला यापुर्वी दिलेल्या तक्रारीचे कारणावरुन तिचा विनयभंग करण्याच्या उद्देशाने तिच्या इच्छेविरुध्द तिचा हात पकडुन तीला दरवाज्या बाहेर ओढले व तिला अश्लिल शिवीगाळ करीत तिच्यावर हमला केल्याने फिर्यादींचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३५४ भादंवि. सहकलम ३(१)(डब्लु)(आय)अ.जा.ज.अ.प्र.का अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. शिंदे पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**३) किराणा दुकानाचा साकळी तोडुन आत प्रवेश करुन साहीत्याची चोरी. :—**

दिनांक १२/०३/२०१७ चे २०.०० ते १३/०३/२०१७ चे १०.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी पुरुषोत्तम रेडीया वय ७४ वर्ष, रा. पवनारखारी यांचे किराणा दुकानाची दरवाज्याची कोणीतरी अज्ञात चोराने साकळी तोडुन आत प्रवेश करुन किराणा दुकानातील सामान किंमती २४,२३१/—रु. चा माल चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे लेखी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन गोबरवाही येथे कलम ४५७,३८० भादवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. बावने पोलीस स्टेशन गोबरवाही हे करीत आहे.

**४) किराणा दुकानाचे शटर्सरचा वाकवुन आत प्रवेश करुन ड्रॉपचे लॉक तोडुन नगदी पैश्याची चोरी. :—**

दिनांक १२/०३/२०१७ चे २१.३० ते १३/०३/२०१७ चे ०८.३० वा. दरम्यान यातील फिर्यादी श्यामसुंदर गोपीकीशन चांडकवय वय ५५ वर्ष, रा. प्रगती कॉलोनी मेघसंकेत कॉम्पलेक्स सेंदुरवाफा यांचे मेघसंकेत कॉम्पलेक्स मधील रामदेव किराणा ॲन्ड जनरल स्टोर्स दुकानाचे लोखंडी शटर्स कोणीतरी अज्ञात चोरटयाने लोखंडी वस्तुने वाकवुन आत प्रवेश करुन लाकडी कॉऊटंर ड्रापचे लॉक तोडुन तेथील नगदी ८०२१/—रु. चे चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ४५७,३८० भादंवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. मडावी पो.स्टे. साकोली हे करीत आहेत.

**५) संगनमत करुन शिवीगाळ करुन काठीने मारुन जखमी केल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक १३/०३/२०१७ चे १८.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी ही आपले किराणा दुकानात हजर असतांना यातील दोनही आरोपीतांनी संगनमत करुन फिर्यादीस शिवीगाळ करीत असता फिर्यादीचा पुतण्या दामु धनराज आखरे वय ३० वर्ष, रा. मकरधोकळा याने शिवीगाळ व भुजा का ठोकतेस असे म्हटले असता आरोपी क्र. १ याने फिर्यादीचे पुतण्यास थापडबुक्याने मारुन डाव्या गालाला चावा घेतला व आरोपी क्र. २ याने घरुन काठी आणुन डोक्यावर काठीने मारुन जखमी केल्याने फिर्यादींचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम ३२४, ५०४,३४ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. बहादुरे पो.स्टे. कारधा हे करीत आहेत.

६) बेकायदेशीर रित्या मास विक्री करतांना व गोहत्या साहीत्य मिळुन आल्याने गुन्हा नोंद . :–

दिनांक १३/०३/२०१७ रोजी १३.३० वा. दर. यातील आरोपीने स्वतःचे आर्थीक लाभा करीता बेकायदेशीर रित्या गोहत्या करुन मास विक्री करतांना मिळुन आला त्याचे पासुन जनावराचे ६० किलो मास, १ मोठी गाय, ४ गोऱ्या, ५ गोरे एकुण १० नग जिवंत जनावरे, १ जुना तराजु व वजने ४ नग लोखंडी सुऱ्या, १० नग नॉयलान दोऱ्या, ६ नग सलाखीचे आकरी असलेली कहे, १ लाकडी गोलाकर बुंदा असा एकुण ५५,४३५/–रु. चा माल मिळुन आल्याने पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ९अ महाराष्ट्र अधी.१९७६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. शेंडे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

७) दारु पिवुन दारुचे नशेत वाहन चालवितांना मिळुन आल्याने गुन्हा नोंद . :–

दिनांक १२/०३/२०१७ चे २३.४८ वा. दरम्यान यातील आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील मोटार सायकल क्र. होंडा पॅशन क्र. एमएच ४९ डब्लु ०९२६ मध्ये सुरेश आसाराम आंबेडारे यास मागे बसवुन दारु पिऊन दारुचे नशेत मोटार सायकल चालवीतांना मिळुन आला त्यास थांबण्याच्या ईशारा केला असता ईशारा भंग करुन पळुन जात असतांना पकडण्यास आल्याने वैदयकीय परीक्षण रिपोर्ट वरुन पोस्टे. दिघोरी येथे कलम १८५(१),१३२/१७७ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. गभणे पोस्टे दिघोरी हे करीत आहेत.

८) अवैध दारु अडयांवर धाडी . :–

दिनांक १३/०३/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो. स्टे. जवाहरनगर, तुमसर, आंधळगाव, साकोली, पालांदुर व पवनी येथे अवैध दारु अडयांवर धाडी घालुन एकुण ११ गुन्हे दाखल करून आरोपींच्या ताब्यातुन ५७ लिटर हातभटटी दारु किंमती २,८५०/–रु. तसेच ११६ लिटर ६४० मिली लिटर देशी/विदेशी + १ मोटार सायकल+ १ सायकल किंमती ४४,१६०/–रु. असा एकुण किंमती ४७,०१०/–रु. चा माल जप्त करण्यात आला आहे.

प्रभारी पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ८८०५६७२६२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.